# छ. शिवाजी महाराजांचे राजकीय धोरण

**डॉ. एस .जी. राक्षसे** गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

जगाच्या इतिहासात अलेक्झांडर ते सीझर आणि सम्राट अशोक ते छ.शिवाजी महाराज असे बरेच चांगले वाईट राजे झाले पण यात सर्वात उजव्या स्वरुपाचा राजा म्हणजे छ. शिवाजी महाराज जेव्हा केव्हा या राजेशाही व्यवस्थेचा वावर उभा राहिला. तेव्हा या राजांनी आपल्या तलवारीला धार लाऊनच राज्यकारभार केला. फारच थोड्यांनी आपुलकीची भाषा वापरली. या थोड्या आणि थोडक्या लोकांत छ. शिवाजी महाराजांचे नाव अग्रभागी आहे. शिवाजी महाराज एका मराठा सरदाराचे पुत्र होते. त्या सरदाराचे नाव शहाजी राजे भोसले होते. पण शिवाजी महाराजांच्या वर त्यांच्या आईच्या म्हणजे जिजाऊच्या शिकवणूकीचा फार मोठा प्रभाव होता. वडील सरदार असल्यामुळे तथाकथित मुस्लीम शाह्यांच्या दरबारात घडणार्या राजकीय घडामोडीचे आकलण पर्यायाने शिवाजी महाराजांना अगदी लहानपणापासून होतेच. यातुनच स्वतंत्र स्वराज्य बांधण्याच्या रणांगणावर बाल शिवबा आपल्या आईच्या मार्गदर्शनाखाली उतरले .पुढे स्वतः चे असे स्वराज्य निर्माण झाले. तिथे सत्ता आली. स्वतः चे स्वराज्य म्हणजे स्व - प्रजा आली प्रजा म्हटल्यावर राजकारभार आला. आणि राजकारभारासाठी राजनिती लागतेच. त्यांच्या या राजनितीला "हिंदवी स्वराज्य " असेच म्हणावे लागेल .

**लेखाचा उद्देश : -**

1) छ. शिवाजी महाराजांच्या राजकीय धोरणाचा म्हणजे च राजकारण , मोहिम , मसलती प्रत्यक्ष लष्करी मोहिमा शत्रुशी सामदामाचे संबंध आणि राजकीय डावपेच याचा आढावा घेणे .
2) हिंदवी स्वराज्याची संकल्पना आणि त्याचा उद्देश अभ्यासणे .
3) छ.शिवाजी महाराजांच्या सत्ता कारणाचा अभ्यास करणे .
4) छ.शिवाजी महाराजांच्या धोरणाचे यशापयश याचा अभ्यास करणे .
5) छ.शिवाजी महाराजांनी निर्मिलेल्या सत्तेचे अंतिम ध्येय काय होते? याचे अध्ययन करणे.

**गृहितके (Hypothesis ) :**

1) छ. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्वतंत्र ओळख निर्माण केली .
2) छ.शिवाजी राजांनी आपल्या सत्तेचा वापर रयतेच्या हितासाठी केला .
3) छ. शिवाजी महाराजांनी समता या तत्वाने राज्यकारभार केला .

**प्लेटोचे आदर्श राज्य - हिंदवी स्वराज्य :**

खरं तर या पृथ्वी तलावरील कोणताही इतिहास कुठल्याही राजकीय व्यवस्थेचे विश्लेषण रोमनाना सोडून करणार नाही .कारण ते तसे करणे खुप अवघड आहे . कारण या पृथ्वीवर मानवी प्रगतीचे निशान पहिले हाती कोणी घेतले तर ते अथेन्स या राज्याने . या अथेन्सचा स्पार्टा नामक राज्याने पेला पोनेशियन युध्दात पराभव केला होता. पण स्पार्टा काही पुढे गेला नाही .तेथिल लोक अज्ञानी आणि रानटी राहिले . या अथेन्समध्येच ख्रि.पू.427 मध्ये प्लेटो या मोठा राजकीय तत्वज्ञ असलेल्या मानसाचा जन्म झाला . त्यांने आपल्या थ्येरीत आदर्श राज्याचे स्वप्न बधितले .त्याच्या मते -" आदर्श राज्यातील शासन संस्था एकच गोष्ट सदैव पाहिल प्जेचे हित मंगल कसे होईल .प्रजेला सुख कसे लाभेल , याच एका गोष्टी कडे शास्ते रात्रंदिवस पाहतील सुख, स्वास्थ्य, शांती, निरामयता ईत्यादी गोष्टी प्रजेस देणे हे शासकाचे काम राहिल ." प्लेटोचे ध्येय काय ? सौंदर्याचे जीवन, न्यायाचे जीवन ,प्रेममय जीवन, 'सत्य शिवं सुंदर जीवन' प्लेटोचे हे ध्येय होते. पण प्लेटोचे हे स्वंप्न त्याच मातीत भंगले होते .प्लेटोच्या हयातीत आणि नंतर सुध्दा रोम आणि रोमच्या दुरवर आदर्श राज्य आणि राजा काही जन्माला येऊ शकला नाही .सगळाच अनागोंदी कारभार रोमच्या पहिल्या काही सम्राटांचे खून झाले होते . म्हणून रोमच्या गादीवर बसणारे सम्राट गुलामापेक्षाही दुःखी असत .पण हे प्लेटोचे तंतोतंत वैशिष्ट्ये असलेले आदर्श राज्य हे दुर हिंदुस्थानात छ. शिवाजी महारांजानी हिंदवी स्वराज्याच्या रुपात स्थापन केले असे आपणास म्हणता येऊ शकते . प्लेटोची आदर्श राज्य आणि राजाची ईच्छाच शिवाजी महाराजांनी पूर्ण केली .हे हिंदवी स्वराज्य खर्या अर्थाने आदर्श राज्य होते. तेच "रयतेचे राज्य "होते .

**राज्याभिषेक :** छ. शिवाजी महाराजांनी तत्कालीन राज्यव्यवस्थेवर व्यवस्थित मांड ठोकण्यासाठी स्वतः चा राज्याभिषेक करुन घेतला. हि त्यांची भूमिका स्वराज्यातील राज्यकारभाराच्या पध्दतीला कायदेशीर मुलामा देणारी होती .

**अष्टप्रधानमंडळ:** छ.शिवाजी महाराजांनी आपला राज्यकारभार व्यवस्थितपणे सांभाळण्यासाठी अष्टप्रधान मंडळ नेमले. यात गुणवत्तेनुसार नेमणूका केल्या .आणि राज्यकारभारात पारदर्शकता आणली .

**संरक्षण धोरण :** छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्याची संरक्षणासाठी गड कोट किल्ले बांधले .छत्रपतींना लहानपणापासूनच युध्दकलेचे शिक्षण दिले गेले. संरक्षण कसे करायचं याचे ज्ञान त्यांना होते.एका पेक्षा एक हरहुन्नर आणि युध्दकलेत तरबेज असणारे निष्णात सरदार त्याःनी नेमले होते. आणि स्वराज्य शत्रूच्या मार्यापासून टिकवून ठेवले. त्यांच्या कडे घोडदळ, पायदळ नावीकदल अशा आनेक तुकड्या होत्या. ज्यांनी युध्दात आपली छाप सोडली .

**संशोधन अभ्यासाचे महत्त्व :** प्रस्तुत संशोधन अध्ययनात छ.शिवाजी महाराजांच्या राजनीतिक धोरणाचा अभ्यास करण्यात आला आहे .त्यांची निती धोरणे कायम समाज विकासासाठी राहिले आहेत. प्रस्तुत काळातील लोकशाही मूल्य असलेले स्वातंत्र्य, समता ,बधुता हे तत्व त्यांनी आपल्या राज्यव्यवस्थेत स्विकारली .त्याचे पालन केले. सत्ता ही जनतेसाठी असते या न्यायाने सत्ता रयते साठी वापरली आणि रयतेचे लोककल्याणकारी राज्य निर्माण केले. छ.शिवाजी महाराजांनी स्विकारलेली राजकीय धोरणे आजच्या राज्यकर्ते यांना ही मार्ग दाखवतात. विशेषतः त्यांचे धर्माच्या बाबतीत असलेले सहिष्णूतेचे धोरण त्यांचे धोरण हे सर्वधर्म समभावाचे होते. म्हणून त्यांच्या राज्यात अनेक पदावर विविध जातीधर्माचे लोक होते.लष्करी व्यवस्थेत सुध्दा मोठ्या हुद्यावर अनेक धर्माचे लोक होते.खर्या आर्थाने त्यांचे राज्य रयतेचे राज्य होते आणि त्याचे संस्थापक छ. शिवाजी महाराज होते .

**संदर्भ ग्रंथ**

1. शिवचरित्र पूष्पाजंली , शब्दप्रभू प्रकाशन.
2. डॉ. पठाण हुसेन ईस्माईल, शिवरायांची धर्मनिती, मनोविकास प्रकाशन.
3. पानसरे गोविंद - शिवाजी कोण होता ?
4. डॉ.सचिन पवार : शिवछत्रपतीचे शिलेदार
5. राजा शिवछत्रपती : सेतू माधवराव पगडी
6. युग पर्वतक छत्रपती शिवाजी महाराज :वा शी बेंद्रे
7. रवींद्र चव्हाण : वेद रायगडाचा
8. डॉ.जयसिंगराव पवार :राजा शिवछत्रपती